

महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ४, अंक ३ — जुलै २०२३ (क्र.१४)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३
संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अस्तित्व टिकेल का?

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

अंजनेरी संवर्धन राखीव ४
ब्रह्मगिरी ते अंजनेरी रोप-वे प्रकल्पासाठी कार्यवाही सुरू; पर्यावरण संस्थांसह ग्रामस्थांचा विरोध

उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प ५
उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पातील रीसॉर्टवर पोलिसांचा छापा

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य ५
कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात शेकरूंच्या संख्येत वाढ

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ६
टिपेश्वरहून आलेला वाघ सव्वादोन वर्षांनंतरही गौताळा औट्रमघाट अभयारण्यात स्थिर

जायकवाडी अभयारण्य ६
जायकवाडीत आलेल्या स्थलांतरित पक्ष्यांना गेल्या हंगामात अंकन – वनाधिकाऱ्यांची माहिती

टिपेश्वर अभयारण्य ७
टिपेश्वरातील ‘वीर’ वाघाचे वनाधिकाऱ्यांना दोन वर्षांनी दर्शन

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ७
ताडोबा अंधारीच्या सुरक्षेसाठी ‘थर्मल ड्रोन’चा वापर
ताडोबा अंधारीच्या पर्यटन शुल्कात वाढ

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ७
ब्रह्मपुरीहून नवेगावात आणलेल्या वाघिणीची मध्य प्रदेशाकडे वाटचाल
छत्तीसगडहून आलेला हत्तींचा कळप नवेगाव परिसरातून परतीच्या मार्गावर

बोर व्याघ्र प्रकल्प ९
बोर व्याघ्र प्रकल्पाच्या जुन्या व नव्या भागांचे एकत्रिकरण

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ९
अकोट ते खंडवा रेल्वेमार्गाचे काम मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबाहेरील मार्गावर सुरू
मेळघाटातील अंबा बरवा अभयारण्यात प्राणिगणना

मुक्ताई भवानी अभयारण्य / यावल अभयारण्य १०
मुक्ताई भवानी आणि यावल अभयारण्यांसह जळगाव जिल्ह्यात प्राणिगणना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १०
मुंबईत कोळ्याच्या नव्या प्रजातीचा शोध
संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित मार्गाच्या परिसरात १८ संरक्षित प्रजाती

**राज्यस्तरीय बातम्या** ११
राज्यातील वन्यजीव संशोधन प्रकल्पांविषयी नवे पोर्टल; राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत उद्घाटन
ताडोबा, पेंच, मेळघाट व्याघ्र प्रकल्पांमध्ये हरयाणातून गिधाडे आणून सोडणार

**प्रादेशिक बातम्या** १२

कोकण १२
रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर किनाऱ्यावर अंकन केलेल्या एका कासवाचा श्रीलंकेपर्यंत प्रवास
पाण्याशिवाय टिकून राहणाऱ्या ६२ वनस्पतींची नोंद; बहुतांशी वनस्पती सह्याद्रीच्या रांगेत

विदर्भ १३
पवनी तालुक्यात एका आठवड्यात वाघाच्या हल्ल्यांत दोन मृत्यू; वनाधिकाऱ्यांना मारहाण
सारस पक्ष्यांची गणना; गेल्या वर्षीच्या तुलनेत पक्ष्यांची संख्या दोनाने कमी
गडचिरोलीतील वन हक्कधारकांना दिलेल्या वन जमिनीची बेकायदा विक्री
माणूस बिबट्या संक्षिप्त वृत्त १६
वन विभागाने जेरबंद केलेल्या बिबट्याची उपासमार १६

**वन्यजीव शिकार व तस्करी वृत्त** १७
अंबरग्रीसची तस्करी करणाऱ्यांना कोल्हापूर जिल्ह्यात अटक; सुमारे ११ कोटींचे अंबरग्रीस जप्त
वाघाच्या कातडीची तस्करी करणाऱ्यांना भंडारा जिल्ह्यातील पवनी इथे अटक
चंद्रपूर जिल्ह्यात कासवाच्या दुर्मीळ प्रजातीची खरेदीविक्री उघडकीस
अकोला शहरातील आयुर्वेदिक दुकानाच्या माध्यमातून वन्यजीवांची तस्करी

**राष्ट्रीय बातम्या** १८
यंदा सहा महिन्यांत देशात सुमारे ९५ वाघांचा मृत्यू; पैकी महाराष्ट्रात १९ मृत्यू
ताडोबा, पेंचसह देशातील १३ व्याघ्र प्रकल्प शिकाऱ्यांचे लक्ष्य; WCCB चा सावधानतेचा इशारा
पँगोलीनची शिकार करणाऱ्या १५ दोषींना तुरुंगवास आणि दंड; १४ राज्यांमध्ये टोळीचे अस्तित्त्व
भारताच्या व्याघ्र प्रकल्पामुळे कार्बन उत्सर्जनात घट, एका अभ्यासाचा निष्कर्ष

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २०
हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या प्रजननावर दुष्परिणाम; साँगबर्ड्सची संख्या घटण्याची शक्यता

**वाचकपत्रे** २१

**महाराष्ट्रातील वन्यजीव अभयारण्ये** २२
**महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने** २३

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४
निसर्गचक्रात महत्त्वाची भूमिका बजावूनही उपेक्षित - वटवाघळे

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड ४, अंक ३, जुलै २०२३ (क्र. १४)**
संपादकः रेश्मा जठार
साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
साहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ता:**C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्स:** ०२० २५६५४२३९ **ई मेल:**marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळ:**https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***
टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.
***
'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**Duleep Matthai Nature Conservation Trust**
C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/
**Paul Hamlyn Foundation**
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

## संपादकीय

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अस्तित्व टिकेल का?

महानगराजवळ असलेली संरक्षित क्षेत्र जगभरात ठिकठिकाणी आहेत. त्यातील काही आपल्या देशातही आहेत. पैकी संजय गांधी राष्ट्रीय उद्याने हे संरक्षित क्षेत्र आपल्या राज्यात दाट लोकवस्तीच्या मुंबई शहरात आहे. मात्र, मुंबईची फुफ्फुसे वगैरे शाब्दिक टेंभा मिरवण्यापलीकडे आपल्याला त्याचे महत्त्व कळलेले नाही. केवळ कायदेशीर तरतुदी आणि न्यायव्यवस्थेमुळे महानगराच्या मध्यात असलेले हे संरक्षित क्षेत्र टिकून राहिले आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. एरवी या जमिनीवर कायमच अनेकांचा डोळा राहिला आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून, उद्यानालगत असलेल्या वन्य अधिवासातून विविध रेषीय प्रकल्प प्रस्तावित आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या बोरिवली ठाणे जोड मार्गासाठी दुपदरी बोगदा, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुलुंड गोरेगाव जोड मार्गासाठी ९ किमीचा बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून प्रस्तावित आहे. उद्यानाबाहेरून मात्र तुंगारेश्वर आणि उद्यानाला जोडणाऱ्या वन्य अधिवासातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण, घोडबंदर रस्त्याचे रुंदीकरण, मुंबई दिल्ली मालवाहतूक मार्ग प्रस्तावित आहे. हे प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांत आहेत.

मुंबई शहर, उपनगरे आणि अवतीभवतीच्या भागांना जोडण्यासाठी हे प्रकल्प असल्याचे सांगितले जात आहे. वास्तविक हे भाग एकमेकांशी एकापेक्षा अधिक प्रकारे जोडलेले आहेत. तरीदेखील प्रवासाचा वेळ वाचवण्याठी, व्यापाराला गती देण्यासाठी हे प्रकल्प आवश्यकच आहेत, असे त्यांचे समर्थन केले जात आहे. त्याही पुढे जाऊन प्रकल्प समर्थकांनी - त्यात काही वनाधिकारीही आले - एखाद्या प्रकल्पामुळे नष्ट होईल इतके वन्यजीवन नाजूक नसते, असाही युक्तीवाद मांडला आहे.

प्रकल्पाच्या पर्यावरणावर पडणाऱ्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी पर्यावरण संरक्षण कायद्यामध्ये पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अधिसूचनेची तरतूद आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून प्रस्तावित प्रकल्पांनाही EIA अधिसूचना लागू होते. खेरीज, संरक्षित क्षेत्र असल्यामुळे पर्यावरणीय मंजुरीसह वन्यजीव मंजुरीही घेणे गरजेचे आहे. किंबहुना, तसे असायला हवे. मात्र येनकेन पळवाटा काढून यातील काही प्रकल्पांना तरी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकनातून सूट देण्यात आली आहे.

प्रत्येक प्रकल्पाचा स्वतंत्रपणे विचार केला असता त्यासाठी लागणारी जागा, त्याच्या उभारणीच्या वेळी होणारे वेगवेगळया प्रकारचे प्रदूषण सुमारे १०० चौ. किमी क्षेत्रावरील वन्य अधिवासासाठी अनेकांना फारसे गंभीर वाटणार नाही. मात्र, पाचसहा प्रकल्पांपैकी प्रत्येक प्रकल्प थोडी थोडी जागा घेणार, प्रत्येकाच्या बांधकामावेळी थोडेफार प्रदूषण होणार. हे रेषीय प्रकल्प जे बहुतेक रस्ते, महामार्ग आहेत ते कार्यान्वित झाल्यावर त्यातील प्रत्येकावरून धूर ओकणारी, रोंरावत जाणारी वाहने दररोज, काही शेकड्यांच्या संख्येने जाणार आणि या सगळयांचा एकत्रित परिणाम अवघ्या १०० चौ. किमी क्षेत्रावरील वन्य अधिवासावर होणार. तसेच, दाट लोकवस्तीने वेढलेले हे राष्ट्रीय उद्यान परिसंस्था सेवा पुरवते. आर्थिक परिमाणातच सांगायचे झाले तर त्या सेवा मिळवण्यासाठी काही लाख कोटी रुपये खर्च करावे लागतील. तरीदेखील, त्या सेवा नैसर्गिक परिसंस्थेतून विनामूल्य मिळतात तेवढ्या परिणामकारकरित्या कृत्रिम उपायांद्वारे मिळवता येणार नाहीत, हे सर्व लक्षात घ्यायला हवे. तेव्हा, प्रस्तावित प्रकल्पांच्या पर्यावरणीय प्रभावाचे एकत्रित मूल्यांकन करण्याच्या जाणकारांच्या सावधगिरीच्या सल्ल्याचे महत्त्व कळेल.

अशा प्रकारचे एकत्रित मूल्यांकन आणि संबंधित क्षेत्र अथवा प्रदेशाची वहन क्षमता (carrying capacity) लक्षात घेऊन प्रकल्पांना मंजुरी द्यावी किंवा नाकारावी, ही सूचना पर्यावरणशास्त्रातील तज्ञ, अभ्यासक गेली १५-१६

वर्षे मांडत आले आहेत. या सूचनेवर याही खेपेला गांभीर्याने अंमलबजावणी झाली नाही तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अस्तित्व येत्या काळात टिकेल का, असा प्रश्न पडावा अशी ही परिस्थिती आहे.

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### अंजनेरी संवर्धन राखीव

**ब्रह्मगिरी ते अंजनेरी रोप-वे प्रकल्पासाठी कार्यवाही सुरू; पर्यावरण संस्थांसह ग्रामस्थांचा विरोध**

नाशिकच्या ब्रह्मगिरी पर्वतापासून अंजनेरीपर्यंत ५.८ किलोमीटर अंतरात प्रस्तावित रोप-वेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. ब्रह्मगिरी ते अंजनेरी रोप-वेसाठी राज्य शासनाशी चर्चा करून निर्णय घेतल्याचे राष्ट्रीय राजमार्ग रसद प्रबंधन लिमिटेड (NHLML) ने म्हटले आहे. मात्र, हा विषय आपल्या अखत्यारित नसून केंद्र सरकारचा प्रकल्प आहे, असे राज्याच्या वन मंत्र्यांनी त्यांच्या भेटीसाठी गेलेल्या पर्यावरणवाद्यांना सांगितले आहे.

राज्यात नाशिकसह पुण्यातील राजगड, रायगड जिल्ह्यातील माथेरान आणि महाडमध्ये रोप-वे होत आहेत. त्यापैकी नाशिकच्या ब्रह्मगिरी-अंजनेरीला विशेष प्राधान्य आहे. केंद्राच्या पर्वतमाला योजनेंतर्गत हे प्रकल्प हाती घेण्यात आले असून, त्यासाठी राज्यातील प्रस्तावित चार रोप-वेसाठी एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.

जुलै २०२३ मध्ये अंजनेरी पर्वतावरील प्रस्तावित रोप-वेचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यावेळी अंजनेरीच्या ग्रामस्थांनी रोप-वेला विरोध दर्शवला नव्हता. मात्र, पर्यावरणप्रेमींनी आक्रमक होत आंदोलनाची हाक दिली होती. सातत्याअभावी आंदोलन पुढे यशस्वी न झाल्याने रोप-वेची कार्यवाही पुढे सुरू झाली. तेव्हा, गिधाडांचा अधिवास, अंजनेरी परिसरातील जैवविविधता राखण्यासाठी नाशिक, त्र्यंबकेश्वरमधील पर्यावरण संस्थांनी रोप-वेला विरोध दर्शवला.

अनावश्यक रोप-वे करण्याऐवजी या परिसरात वृक्षलागवड करण्याची मागणी पर्यावरण संस्थांच्या प्रतिनिधींनी मुंबईत राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर मांडली. मात्र, हा विषय आपल्या अखत्यारित नसून केंद्र सरकारचा प्रकल्प आहे, असे मुनगंटीवार यांनी सांगितले.

यापूर्वी ब्रह्मगिरी मेटघर ग्रामस्थांनी रोप-वे विरोधात ठराव करून विरोध दर्शवला आहे. मेटघर किल्ला ग्रामपंचायतीने ९ ऑगस्ट २०२२ ला विरोधाचा ठराव केला आहे. गडदुर्ग संवर्धनात काम करणाऱ्या शासन नियुक्त समित्यांनीही विरोध दर्शवला आहे.

आयुर्वेदिक दुर्मिळ औषधी वनस्पती संवर्धनासाठी, जटायू पक्षांच्या सेवेसाठी शासनाकडून राष्ट्रपती पुरस्कार दिला जातो. मात्र, सरकार असे अधिवास राखणार नसेल तर या पुरस्कारांना अर्थ नाही, असे म्हणून खोरीपाडा इथली जैवविविधता व गिधाड संवर्धनासाठी पुरस्कार मिळालेले शंकर बाबा शिंदे यांनी पुरस्कार परत करण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, दीड वर्षापूर्वी अंजनेरी अभयारण्य करण्याची पडताळणी वन विभागाने सुरू केली आहे. रोप-वेसंदर्भात कोणताही लेखी प्रस्ताव अथवा जागा हस्तांतरणासंदर्भात मागणी अद्याप झाली नसल्याचे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी सांगितले.


**स्रोत** – 'ब्रह्मगिरी ते अंजनेरी होणार 'रोप-वे'; 'NHLML'तर्फे सविस्तर प्रकल्प अहवालाची तयारी,' *maharashtratimes.com*, १३.०५.२०२३.
'रोप-वे विरोधात आक्रोश तीव्र; मेटघर ग्रामपंचायतीचा विरोधात ठराव,' *www.esakal.com*, ०७.०७.२०२३.
'ब्रह्मगिरी-अंजनेरी रोपवे वादाचा चेंडू वन मंत्र्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे!' *www.esakal.com*, ०१.०७.२०२३.

## उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प

### उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पातील रीसॉर्टवर पोलिसांचा छापा

उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पातील टायगर पॅराडाईज रीसॉर्टवर पोलिसांनी छापा घातला. तिथे अश्लील नृत्य करणाऱ्यांविरोधात कारवाई केली आणि लाखो रुपयांची ध्वनी उपकरणे, दोन लॅपटॉप, विदेशी दारु, आणि १,३०,००० रुपये रक्कम जप्त केली.

**स्रोत** – 'व्याघ्र प्रकल्पातील टायगर पॅराडाईज रिसॉर्टवर पोलिसांचा छापा,' *www.esakal.com*, ०३.०६.२०२३.



## कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य

### कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात शेकरूच्या संख्येत वाढ

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात शेकरूंच्या संख्येत गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे. यंदाच्या गणनेत पहिल्या टप्प्यात अभयारण्यात शेकरूंची नवीन २६०, जुनी १८५ अशी ४४५ घरटी आढळले आहेत. एक शेकरू चार ते पाच घरट्यांचा वापर करते. घरट्यांच्या संख्येवरून त्यांची संख्या ९२ असल्याचे निरीक्षण नोंदवून ही संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत ३० ने वाढल्याचे वन्यजीव विभागाने म्हटले आहे.

अकोले तालुक्यात शेकरूंची नोंद करण्याचे काम जूनअखेरीस ९०% पूर्ण झाले होते. त्यावेळी जाहीर करण्यात आलेली ही आकडेवारी आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३, खंड ३ अंक ३)*

**स्रोत** - 'हरिश्चंद्रगड अभयारण्यातील शेकरूंची संख्या वाढली; गत वर्षीची संख्या होती १८५,' *www.esakal.com*, २५.०६.२०२३.

## गौताळा औट्रमघाट अभयारण्य

### टिपेश्वरहून आलेला वाघ सव्वादोन वर्षांनंतरही गौताळा औट्रमघाट अभयारण्यात स्थिर

टिपेश्वर अभयारण्यातून आलेला वाघ गौताळा औट्रमघाट अभयारण्यात स्थिरावला आहे. या वाघाच्या आगमनास सव्वादोन वर्षे पूर्ण झाली आहेत. वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी अभयारण्यात ठिकठिकाणी स्वयंचलित कॅमेरे लावण्यात आले आहेत. वाघाच्या सुरक्षेसाठी वेळप्रसंगी दोन ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर केला जात आहे.

चाळीसगाव तालुक्यातील गौताळा औट्रमघाट अभयारण्यात साधारणपणे फेब्रुवारी २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वाघाचे आगमन झाले. सुरुवातीला त्याच्या पायाचे ठसे दिसून आले. त्यानंतर मार्च २०२१ मध्ये स्वयंचलित कॅमेऱ्याने वाघाची छबी टिपली. तसेच वाघाची विष्ठाही आढळली. वाघ आल्याने वन्यजीव विभागाने त्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना हाती घेतल्या.

हा वाघ टिपेश्वरहून तेलंगणात गेला. तिथून परत नांदेड, किनवट, हिंगोली, बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्य, अजिंठामार्गे तो गौताळ्यात आला (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक १ , खंड २ अंक २*). हा वाघ गौताळ्यात आला त्यावेळी तो अंदाजे सव्वातीन ते साडेतीन वर्षे वयाचा असावा, असा तत्कालीन वनाधिकाऱ्यांचा अंदाज होता.

याआधी गौताळ्यात साधारणपणे ५१ वर्षांपूर्वी वाघ आढळून आला होता. त्यानंतर आईपासून विभक्त झालेला एक अडीच वर्षांचा वाघ डिसेंबर २०१९ मध्ये अजिंठा वनक्षेत्रात आला होता. काही दिवस मुक्काम

केल्यावर तो परतीच्या मार्गावर गेला होता. तो वाघही टिपेश्वर अभयारण्यातील होता.

**स्रोत** – 'विदर्भाचा वाघ गौताळ्यात आला अन् तिथेच रमला; ड्रोनने ठेवली जातेय नजर,' *maharashtratimes.com*, २५.०५.२०२३.

## जायकवाडी अभयारण्य

### जायकवाडीत आलेल्या स्थलांतरित पक्ष्यांना गेल्या हंगामात अंकन – वनाधिकाऱ्यांची माहिती

जायकवाडी पक्षी अभयारण्यात आढळलेल्या स्थलांतरित पक्ष्यांच्या ३७ प्रजातींना यंदाच्या स्थलांतराच्या हंगामात (गेल्या हिवाळ्यात सुरू झालेला हंगाम) अंकन करण्यात आले. एकूण ११३ पक्ष्यांना रींग लावून अंकन केल्याची माहिती साहाय्यक वन संरक्षक (वन्यजीव) राजेंद्र नाळे यांनी मे महिन्याच्या मध्यात दिली.

अंकन केलेल्या पक्ष्यांमध्ये ग्रेटर फ्लेमिंगो, बार-हेडेड गूज, केंटिश प्लोवर, लिट्ल रींग्ड प्लोवर, ब्लॅक टेल्ड गॉडविट, कॉमन स्नाईप, कॉमन टील, कॅस्पिअन टर्न आणि पल्लासज् गल यांच्यासह अन्य पक्ष्यांचा समावेश आहे. सेंट्रल एशिअन फ्लायवे या पक्ष्यांच्या स्थलांतर मार्गाच्या अभ्यासाचा एक भाग म्हणून हे अंकन केले आहे. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) या संस्थेने रीतसर परवानगी घेऊन अंकन केले आहे. त्यासाठी वनाधिकारी आणि स्थानिक जाणकारांची मदत संस्थेने घेतली.

पक्ष्यांना अंकन केल्यामुळे त्याचा स्थलांतर मार्गावरील प्रवास, विश्रांतीचे थांबे, प्रजननाची स्थळे आणि हिवाळ्यातील थंडीपासून बचावाची स्थळे याबाबत माहिती मिळवणे शक्य होणार आहे.

रींग लावलेले पक्षी दिसून आल्यास bands@bnhs.org इथे कळवण्याचे आवाहनही वृत्तात केले आहे.

**स्रोत** – प्रसाद जोशी. '113 migratory birds of 37 species ringed at Jayakwadi bird sanctuary,' *timesofindia.indiatimes.com*, १६.०५.२०२३.

## टिपेश्वर अभयारण्य

### टिपेश्वरातील 'वीर' वाघाचे वनाधिकाऱ्यांना दोन वर्षांनी दर्शन

टिपेश्वर अभयारण्यातील 'वीर' नावाचा वाघ दोन वर्षांपूर्वी दिसेनासा झाला. वनाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शोध घेऊनही तो आढळला नाही. टिपेश्वर सोडून शेजारच्या जंगल प्रदेशात तो गेल्याचे सांगून शोध मोहीम थांबली. यंदा जून महिन्याच्या मध्यात वीर टिपेश्वर अभयारण्यात परतल्याचे वृत्त आहे. कपाळावरील 'व्ही' अक्षरासारख्या चिन्हावरून वनाधिकाऱ्यांनी त्याला ओळखले आहे.

टिपेश्वर अभयारण्यातील टी-१ वाघिणीने २०१८ मध्ये चार बछड्यांना जन्म दिला. वीर हा त्यातील एक. २०२१ मध्ये तो तीन वर्षांचा झाल्यानंतर अभयारण्यातून बाहेर पडला. वनाधिकाऱ्यांनी शोध घेतला असता तो आढळला नाही. त्याला कोणत्याही प्रकारे अंकन केलेले नसल्याने त्याचा नेमका ठावठिकाणा लागला नाही. जून महिन्यात टिपेश्वरात दिसून आलेल्या एका वाघाचे वनाधिकाऱ्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले. दोन वर्षांच्या काळात बदल झाला असला तरी हा वाघ वीर आहे हे निरीक्षणांती त्यांनी स्पष्ट केले.

**स्रोत** – 'टिपेश्वरचा 'वीर' २ वर्षांनंतर परतला स्वगृही; कपाळावरील चिन्हावरुन पटली ओळख,' *maharashtratimes.com*, २३.०६.२०२३.



## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोबा अंधारीच्या सुरक्षेसाठी 'थर्मल ड्रोन'चा वापर

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी 'थर्मल ड्रोन'चा वापर केला जाणार आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला पुण्यातील डीपी वर्ल्ड कंपनीने 'थर्मल ड्रोन' दिले आहेत. वनखात्यातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना हे 'ड्रोन' चालवण्यासाठी वर्षभर प्रशिक्षण दिले जाणार आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारे निर्माण केलेले हे 'ड्रोन' प्रकल्पातील ज्या भागांत प्रत्यक्ष जाणे शक्य नाही, त्या भागांतील माहिती संकलित करण्यासाठी, जलाशयांच्या स्तरांचे मापन करण्यासाठी आणि नकाशे तयार करण्यासाठी उपयुक्त ठरतील. 'ड्रोन'मधील 'थर्मल इमेजिंग' म्हणजे उष्णतेची नोंद घेण्याच्या क्षमतेमुळे, जमिनीवरील आगीची लक्षणे ओळखणे वन विभागाला शक्य होईल. बचाव कार्य आणि वन्यजीवांचा माग ठेवण्याच्या क्षमतेत सुधारणा, वनातील गुन्ह्यांमध्ये घट आणि क्षेत्र कर्मचारी व स्थानिक समुदायांच्या सुरक्षिततेची निश्चिती करणे शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

**स्रोत** – ''थर्मल ड्रोन'ने स्वीकारली ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या सुरक्षेची जबाबदारी,' *www.loksatta.com,* २७.०६.२०२३.

### ताडोबा अंधारीच्या पर्यटन शुल्कात वाढ

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बफर क्षेत्रातील पर्यटन शुल्क वाढवण्याचा निर्णय प्रकल्प व्यवस्थापनाने घेतला आहे. १ जुलैपासून किमान १,००० रुपयांची वाढ करण्यात येणार आहे.

ताडोबा व्यवस्थापनाने १ जुलैपासून जिप्सी वाहनांमध्ये 'सीट–शेअरिंग'चा पर्याय दिला आहे. एका प्रौढ व्यक्तीला यासाठी १,५०० रुपये द्यावे लागणार आहेत. वाहनात 'सिंगल बेंच'साठी ४,००० रुपये शुल्क द्यावे लागणार आहे. आठवड्याच्या दिवशी एका सफारीची किंमत ५,१२५ रुपये असेल तर शनिवार, रविवार आणि सरकारी सुटीच्या दिवशी ६,१२५ रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. यामध्ये १,७०० रुपये प्रवेश शुल्क, २,७०० रुपये वाहन शुल्क आणि ६०० रुपये गाईड शुल्काचा समावेश आहे.

गाईड आणि वाहन मालकांकडून शुल्क वाढवण्याची मागणी प्रलंबित होती.

पावसाळ्यात दरवर्षीप्रमाणे १ जुलैपासून तीन महिने गाभा क्षेत्रातील पर्यटन बंद राहील. पुन्हा एक ऑक्टोबरपासून पर्यटन सुरू होईल तेव्हा गाभा क्षेत्रातील पर्यटन शुल्कात वाढ केली जाणार आहे.

**स्रोत** – 'ताडोबा प्रकल्पातील पर्यटन १ जुलैपासून महागणार,' *www.loksatta.com*, २५.०६.२०२३.



## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### ब्रह्मपुरीहून नवेगावात आणलेल्या वाघिणीची मध्य प्रदेशाकडे वाटचाल

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात ब्रह्मपुरीतून आणलेली टी-१ वाघीण प्रकल्पाबाहेर पडली असून मध्य प्रदेशाच्या दिशेने निघाली आहे.

नवेगाव नागझिऱ्यातील ही वाघीण गोंदिया तालुक्यातील रावणवाडी चांगेरा परिसरात शिरली. तिथून ती कामठा मार्गे आमगाव आणि सालेकसा तालुक्याकडे निघाल्याचा अंदाज होता. ७ जुलैपासून दोन दिवस ती

आमगाव-सालेकसा तालुक्यात होती. इथून पुढे तिची वाटचाल मध्य प्रदेशच्या दिशेने होत असल्याचे वन विभागाने म्हटले आहे.


चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रातून आणलेल्या दोन वाघिणींना २० मे रोजी वन विभागाने नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सोडले. त्यानंतर आठ-दहा दिवसांनी या दोन वाघिणींपैकी एक वाघीण टी-१ अर्जुनी मार्गे गोरेगाव तालुक्यातील पिंडकेपार, हिरडामाळी परिसरात गेली. त्यानंतर तिने गोंदिया तालुक्याकडे मोर्चा वळवला, सुमारे दीड महिना पांगडी जलाशय परिसरात तिने मुक्काम केला. यानंतर ही वाघीण रावणवाडी चांगेरा परिसरातील राजा-राणी वनपरिक्षेत्रात शिरली. वन विभागाचे पथक या परिसरात तळ ठोकून होते.

ही वाघीण ७ जुलै रोजी दुपारी ३:३० च्या सुमारास हा परिसर सोडून कामठा (आमगाव) आणि घाट्टेमणी (सालेकसा) भागात गेली. या वाघिणीला उपग्रहाधरित अंकन केले आहे. कामठा-घाट्टेमणी परिसरात टी- १ चा वावर असल्याने वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांना सावधानता बाळगण्याचा सल्ला दिला आहे. नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडू नये, शेतीच्या कामासाठी जातानासुद्धा तीनचार जणांनी सोबत जावे, हातात काठी घेऊन जावे, वाघीण दिसल्यास आरडाओरड करू नये, शौचास बाहेर जाऊ नये, अशा सूचना केल्या आहेत. वाघिणीच्या मागावर वन विभागाची चार पथके लक्ष ठेवून आहेत.

**स्रोत** – 'गोंदिया : टी-१ वाघिणीची मध्य प्रदेशच्या दिशेनं वाटचाल; आमगाव – सालेकसा तालुक्यात दहशत,' *www.loksatta.com*, ०९.०७.२०२३.



**छत्तीसगडहून आलेला हत्तींचा कळप नवेगाव परिसरातून परतीच्या मार्गावर**



नवेगाव राष्ट्रीय उद्यान व नवेगाव वन्यजीव अभयारण्यातील मलकाझरी परिसरात वास्तव्याला असलेला हत्तींचा कळप आता परतीच्या प्रवासाला लागला आहे.

२० जूनच्या आसपास कळपाचा वावर इटियाडोह धरण परिसरात होता. १५ जून रोजी हत्तींचा कळप चुटीया ते झाशीनगर इथल्या जंगलातून भ्रमंती करत रात्री तिडका या गावात पोहोचला. या गावाशेजारी एक तलाव आहे. त्या ठिकाणी हा कळप बराच वेळ थांबला. त्यानंतर कोणालाही त्रास न देता हत्ती पुढे येरंडी दर्रेच्या जंगलाच्या दिशेला गेले. १६ जून रोजी सकाळी १० च्या सुमारास इटियाडोह जलाशयामध्ये हा कळप दिसून आला.

वर्ष २०२२ च्या सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यांत हत्तींचा हा कळप गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात दाखल झाला होता. या कळपाने गडचिरोली जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात यंदा २६ एप्रिल रोजी पुनरागमन केले. नवेगावबांध वनपरिक्षेत्रांतर्गत कवठा जंगल परिसरात हत्ती थांबले होते. बोळदे, कावठा, डोंगरगाव, इंजोरी, अरततोंडी, बोरटोला, सिरेगावबांध या गावांमध्ये या कळपाच्या वावरामुळे धान आणि ऊस पिकांचे नुकसान झाले. ३ ऑक्टोबर २०२२ ला तिडका इथल्या एका आदिवासी शेतकऱ्याचा हत्तींच्या कळपाकडून मृत्यू झाला. तसेच, १२ ऑक्टोबरच्या रात्री नागनडोह इथे हत्तींकडून आदिवासींच्या वस्तीतील घरांचे व इतर जीवनोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. त्यानंतर हत्तींचा कळप गडचिरोली जिल्ह्याच्या दिशेने वळला.

२६ एप्रिलपासून १५ जूनपर्यंत मलकाझरी परिसरात हत्तींचे वास्तव्य होते. त्यानंतर, आता चुटिया

गावाजवळ रस्ता ओलांडत तिडका मार्गे गोठणगाव जलाशयाच्या क्षेत्रात सध्या हत्ती वास्तव्याला आहेत. ते गडचिरोली मार्गे छत्तीसगढकडे परत जाण्याची शक्यता, नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानातील वनाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, खंड ३ अंक ४, खंड ४ अंक १*)

**स्रोत** – 'गोंदिया: रानटी हत्तींचा कळप आता परतीच्या प्रवासाला; इटियाडोह धरण परिसरात मुक्तसंचार,' *www.loksatta.com*, २०.०६.२०२३.

## बोर व्याघ्र प्रकल्प

### बोर व्याघ्र प्रकल्पाच्या जुन्या व नव्या भागांचे एकत्रिकरण

वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांच्या सीमेवरील बोर व्याघ्र प्रकल्पात वर्ष २०१२ मध्ये नवीन क्षेत्राचा समावेश झाला. त्यामुळे प्रकल्पाचे जुना व नवा असे दोन भाग झाले. खेरीज, राखीव बफर क्षेत्र होते. प्रशासकीय कारभारासाठी हे क्लिष्ट असल्यामुळे प्रकल्पाचे दोन भाग एकत्र करण्याची मागणी होती. ती मान्य झाली असून कडवस, हिंगणी व बांगडापूरचे क्षेत्र एकत्रित करण्यात आले आहे.

या एकसंध बोर प्रकल्पाचे मुख्यालय वर्धेत राहणार असून उपसंचालक दर्जाचा अधिकारी काम पाहणार असून पेंच व्याघ्र प्रकल्पाचे संचालक कारभारावर नियंत्रण ठेवणार आहेत. वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांतील १२ परिमंडळांचा प्रकल्पात समावेश झाला आहे.

**स्रोत** – 'वर्धा: बोर पर्यटनास मिळणार चालना, जुना व नवा बोर प्रकल्पाचे एकत्रीकरण,' *www.loksatta.com*, ०५.०७.२०२३.



## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### अकोट ते खंडवा रेल्वेमार्गाचे काम मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबाहेरील मार्गावर सुरू

अकोट ते खंडवा ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी निश्चित झालेल्या, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबाहेरून आखलेल्या पर्यायी मार्गावर भूसंपादन सुरू झाले आहे. या मार्गासाठी लागणाऱ्या खासगी जमिनींच्या अधिग्रहणासाठी भारत सरकारने राजपत्र जाहीर केले असून मार्गावरील कामांसाठी निविदादेखील प्रसिद्ध झाल्या आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून जाणारा मार्ग तुकाईवरून दबका, धूलघाट, वानरोड, हिवरखेड इथून अडगाव असा होता. आता प्रकल्पाच्या बाहेरून रेल्वेमार्ग तुकाईवरून खिकरी, खकनार, उसरनी, जामोद, सोनाला, हिवरखेड मार्गे अडगावला पोहोचणार आहे.

राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगण आदींसह १० राज्यांना जोडणारा व कमी वेळेत दिल्ली गाठण्यासाठी सोयीस्कर ठरणाऱ्या रेल्वेमार्गाचा अकोट ते खंडवा ब्रॉडगेज टप्पा मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून नेण्याला वन्यजीवप्रेमी व पर्यावरणवाद्यांनी विरोध दर्शवला. हे प्रकरण न्यायालयात गेले. त्यानंतर केंद्र सरकारने हा रेल्वेमार्ग मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबाहेरून, बुलढाणा जिल्ह्यातून पर्यायी मार्गाने करण्यास मान्यता दिली. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ४, खंड ३ अंक ३, खंड ४ अंक १*)

**स्रोत** – 'उत्तर व दक्षिण भारताला जोडणाऱ्या रेल्वेमार्गाच्या निर्माण कार्याला गती; मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा अडथळा दूर,' *www.loksatta.com*, १७.०४.२०२३.

### मेळघाटातील अंबा बरवा अभयारण्यात प्राणिगणना

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अंबा बरवा अभयारण्यात ५ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या रात्री प्राणिगणनेचे आयोजन करण्यात

आले होते. ३५ पाणवठ्यांवर गणना करण्यासाठी मचाणे उभारण्यात आली होती. प्रत्येक मचाणावर अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. मात्र, यंदा वन्यप्राणीप्रेमींना या गणनेत सहभागी करून घेतलेले नाही.

१४,००० हेक्टर क्षेत्र व्यापलेल्या अंबा बरवा अभयारण्यात एकूण पाच मंडळे आणि १९ नियतक्षेत्रे आहेत. गेल्या वर्षी प्रत्यक्ष प्राणिगणनेदरम्यान वाघ बिबट्यांसह ८०१ वन्यप्राण्यांनी दर्शन दिले होते. यंदाच्या प्राणिगणनेविषयी पुढील वृत्त उपलब्ध झाले नाही.

**स्रोत** – 'वाघांच्या अधिवासाने समृद्ध 'अंबाबरवा' मध्ये आज प्राणिगणना, वन्य विभागाची जय्यत तयारी,' *www.loksatta.com*, ०४.०५.२०२३.

## मुक्ताई भवानी अभयारण्य / यावल अभयारण्य

### मुक्ताई भवानी आणि यावल अभयारण्यांसह जळगाव जिल्ह्यात प्राणिगणना

बुद्ध पौर्णिमेच्या (५ मे) रात्री मुक्ताई भवानी आणि यावल अभयारण्यांसह आणि जळगाव जिल्ह्यातील इतर ठिकाणी करण्यात आलेल्या गणनेत १३८ प्राण्यांची नोंद झाली. मुक्ताई भवानी अभयारण्यात वाघाचे व यावल अभयारण्यात बिबट्याचे दर्शन झाले.

प्राणिगणनेत वनाधिकारी, वनकर्मचाऱ्यांसह सातपुडा निसर्ग संवर्धन संस्था, चातक निसर्ग संवर्धन संस्था आणि जळगावातील १० न्यायाधीशांचा सहभाग होता.

**स्रोत** – 'जळगाव वनपरिक्षेत्रात पट्टेदार वाघ, तरस, अस्वलासह बिबटे; वनविभागाच्या गणनेत १३८ प्राण्यांची नोंद,' *www.loksatta.com*, ०८.०५.२०२३.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### मुंबईत कोळ्याच्या नव्या प्रजातीचा शोध

मुंबईतील गोरेगाव इथल्या 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'च्या सीईसी परिसरात 'जंपिंग स्पायडर' म्हणजे उड्या मारणाऱ्या कोळ्याची नवी प्रजाती आढळली आहे. संशोधक प्रणव जोशी आणि ऋषिकेश त्रिपाठी यांनी ही प्रजाती नोंदवली असून त्यांचा याविषयीचा शोधनिबंध 'आर्थ्रोपॉड सिलेक्टा' या आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

प्रणव जोशी यांना ही प्रजाती जून २०२१ मध्ये सीईसीच्या आवारात पहिल्यांदाच दिसली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये या प्रजातीच्या नर आणि मादी कोळ्यांना पकडून संशोधनासाठी केरळमधील 'क्राइस्ट युनिव्हर्सिटी'च्या प्रयोगशाळेत नेले. अभ्यासांती ही नवी प्रजाती असल्याचे स्पष्ट झाले. या प्रजातीला 'हसारियस मुंबई' नाव देण्यात आले आहे.

**स्रोत** – 'उड्या मारणाऱ्या कोळ्याचा शोध,' *www.loksatta.com*, ०८.०७.२०२३.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित मार्गाच्या परिसरात १८ संरक्षित प्रजाती

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखाली जवळपास १० किमी लांबीचे दोन भूमिगत बोगदे खणावे लागणार असलेल्या ठाणे बोरिवली जोड मार्ग (TBLR) प्रकल्पासाठी झालेल्या पर्यावरणशास्त्रीय सर्वेक्षणात प्रकल्प परिसरात १८ संरक्षित प्रजातींच्या अस्तित्त्वाची नोंद झाली आहे.

संरक्षित १८ प्रजातींमध्ये आठ प्रजाती सस्तन प्राण्यांच्या, तीन सरपटणाऱ्या प्राण्यांच्या आणि सात प्रजाती पक्ष्यांच्या आहेत. बिबट्या, रस्टी स्पॉटेड कॅट, जंगल कॅट, स्मॉल इंडिअन सिवेट, चौसिंगा, माऊस डिअर, कोल्हा, सांबर हे सस्तन प्राणी, इंडिअन मार्श क्रॉकोडाईल ही मगर, घोरपड, अजगर हे सरीसृप आणि मोर, ऑस्प्रे, व्हाईट-बेलीड सी ईगल, पेरेग्रीन फाल्कन आणि गिधाडांच्या इंडिअन, व्हाईट रम्पड, ईजिप्शिअन या १८ प्रजाती असून या सर्वांचा वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या अनुसूची-१ मध्ये समाविष्ट आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा-(MMRDA)-ने सर्वेक्षणाचा अहवाल तयार केला आहे.

या सर्वेक्षणाला व्याप्ती आणि काळाच्या मर्यादा होत्या. सखोल सर्वेक्षण केल्यास या भागातील अन्य संरक्षित प्रजातीही दिसून येतील, अशी शक्यता MMRDA च्या अहवालात नोंदवली आहे.

TBLR प्रकल्पाला वन्यजीव मंजुरी मिळवण्याकरता MMRDA ने हा अहवाल तयार केला आहे. TBLR साठी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणारे बोगदे जमिनीच्या किमान २५ मी खाली बांधले जाणार आहेत. त्यामुळे वन्यजीवनाची जवळपास नगण्य हानी होईल, असे अहवालात नमूद केले आहे.

मात्र, पर्यावरणशास्त्र विषयातील तज्ज्ञांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जाणाऱ्या प्रकल्पांच्या एकत्रित परिणामांकडे लक्ष वेधले आहे. TBLR खेरीज गोरेगाव मुलुंड जोड रस्ता (GMLR) राष्ट्रीय उद्यानातून प्रस्तावित आहे. हा रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिका बांधणार आहे. वर्ष २०१७ मध्ये TBLR प्रमाणेच GMLR साठी महानगरपालिकेने केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाकडे पर्यावरणीय मंजुरीसाठी अर्ज केला होता. मात्र, हे दोन्ही रस्ते राज्य वा राष्ट्रीय महामार्ग नाहीत, त्यामुळे त्यांना पर्यावरणीय मंजुरीची अट लागूच होत नाही, असे मंत्रालयाने सांगितले (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक २*). त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांकरता पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) करण्यात आले नाही. विरार अलिबाग मल्टी-मोडल कॉरीडॉर आणि दिल्ली मुंबई डेडिकेटेड फ्रेट कॉरीडॉर या दोन्ही प्रकल्पांचे भागही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून प्रस्तावित आहेत.

या दोन प्रकल्पांबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने स्वतंत्र विचार केला आहे. मात्र, या विविध रेषीय प्रकल्पांचा एकत्रित परिणाम संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पर्यावरणावर होणार आहे, हे लक्षात घेण्याची गरज पर्यावरणशास्त्र तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**स्रोत** – प्रयाग अरोरा-देसाई. ‘Survey finds 18 highly protected species in alignment of Thane-Borivali twin tunnels,’ *www.hindustantimes.com*, २४.०६.२०२३.

## राज्यस्तरीय बातम्या

### राज्यातील वन्यजीव संशोधन प्रकल्पांविषयी नवे पोर्टल; राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत उद्घाटन

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मे महिन्याच्या सुरुवातीला राज्य वन्यजीव मंडळाची २० वी बैठक झाली.

या वेळी महाडाटा वेब पोर्टलचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केले. महाराष्ट्रात सुरू असणाऱ्या संशोधन प्रकल्पांसाठी एक प्रसार मंच म्हणून हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी पाहा https://mahadata.wii.gov.in/

बैठकीत अभयारण्यातील व पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील, व्याघ्र भ्रमण मार्गातील विकास प्रकल्पांच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने ब्रॉडबॅण्ड कनेक्टीव्हीटीसाठी भूमिगत ऑप्टीकल फायबर केबलचे प्रस्ताव, रस्ते प्रकल्पांचे प्रस्ताव व अन्य विकास कामांच्या प्रस्तावांचा समावेश होता. बैठकीत १९ प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारशीसाठी सादर करण्याचे ठरले.

राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्र व संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वाघासह वन्य प्राण्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. भारतीय व्याघ्रगणना २०२२ च्या आकडेवारीनुसार, राज्यात वाघांची संख्या ३१२ वरून ३९० झाली आहे. दर चार वर्षांनी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) मार्फत व्याघ्र प्रकल्पांतील व्यवस्थापनाचे मूल्यांकन केले जाते. वर्ष २०२२ मधील मूल्यांकनात पेंच व्याघ्र प्रकल्प देशात आठव्या क्रमांकावर आला असून राज्यातील अन्य व्याघ्र प्रकल्पांचा दर्जा वाढला असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

**स्रोत** - जनसंपर्क कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय. ‘राज्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करावे:

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश,' *https://mahasamvad.in/?p=95199*, ०२.०५.२०२३.

### ताडोबा, पेंच, मेळघाट व्याघ्र प्रकल्पांमध्ये हरयाणातून गिधाडे आणून सोडणार


राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा- (NTCA)-ची तांत्रिक समिती आणि हरयाणा सरकारने पिंजोरमधून गिधाडांच्या २० जोड्या महाराष्ट्रात पाठवण्यास परवानगी दिली आहे. त्यापैकी प्रत्येकी सहा गिधाडे ताडोबा अंधारी आणि पेंच व्याघ्र प्रकल्पांमध्ये तर दहा गिधाडे मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडणार आहेत. या पक्ष्यांना सोडण्यासाठी 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) मदत करणार आहे.

हरयाणाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकां- (वन्यजीव) -कडे राज्य सरकारने गिधाडांची मागणी केली होती. त्यासाठी पिंजोर इथल्या प्रजनन केंद्रातून पांढऱ्या पाठीची (व्हाईट रम्प्ड) आणि लांब चोचीची (लाँग बिल्ड) गिधाडे महाराष्ट्रात पाठवण्याचा निर्णय झाला. पुणे आणि नाशिक इथे गिधाड प्रजनन आणि संवर्धन केंद्र स्थापन करण्याची तयारी सुरू आहे. केंद्रांचे आराखडे तयार झाल्यानंतर राज्य सरकार परवानगीसाठी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणा – (CZA) कडे प्रस्ताव पाठवेल. CZA ने मंजुरी दिल्यानंतर पुढील प्रक्रिया होईल. तसेच, गिधाडे सोडण्यासाठीही CZA ची मंजुरी आवश्यक आहे. मंजुरी मिळाल्यानंतर गिधाडांना अंकन करून सोडणार आहेत.

BNHS ने पिंजोर इथल्या प्रजनन केंद्रात ७०० हून अधिक गिधाडांना वाढवले. या गिधाडांना टप्प्याटप्प्याने त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडणे हा या प्रकल्पाचा हेतू आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातही हे पक्षी सोडले जाणार आहेत.

एप्रिल महिन्यात मध्य प्रदेशात पांढऱ्या पाठीची २० गिधाडे पाठवण्याची परवानगी केंद्रीय वन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालयाने दिली. वन विहार राष्ट्रीय उद्यान, भोपाळ इथे संवर्धन प्रजनन कार्यक्रमासाठी त्यांचा वापर केला जाणार आहे.

**स्रोत** - 'हरयाणातून गिधाडांच्या २० जोड्या मेळघाटात,' *www.esakal.com*, १५.०५.२०२३.



## प्रादेशिक बातम्या

<u>कोकण</u>


### रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर किनाऱ्यावर अंकन केलेल्या एका कासवाचा श्रीलंकेपर्यंत प्रवास

कोकण किनाऱ्यावर उपग्रहाधारित अंकन केलेल्या 'बागेश्री' या ऑलिव्ह रिडले सागरी कासवाने गुहागर ते कन्याकुमारी असा प्रवास करून पुढे श्रीलंकेचा समुद्र गाठला आहे.

'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' आणि महाराष्ट्र वन विभागाच्या 'मँग्रूव्ह फाउंडेशन'ने सुरू केलेल्या या संशोधन प्रकल्पात २३ फेब्रुवारी रोजी गुहागरच्या समुद्रकिनाऱ्यावर दोन मादी ऑलिव्ह रिडले कासवांना अंकन केले होते. ही कासवे घरटी करण्यासाठी किनाऱ्यावर आली होती. त्यांनी घरटी केल्यानंतर त्यांना अंकन करून पुन्हा समुद्रात सोडण्यात आले. या दोन्ही कासवांना 'बागेश्री' व 'गुहा' अशी नावे देण्यात आली. त्यापैकी 'गुहा' हे मादी ऑलिव्ह रिडले कासव लक्षद्वीपपर्यंत जाऊन परत आले आणि आता ते कर्नाटक किनाऱ्याच्या आसपास आहे.

मागच्या वर्षी पाच कासवांना अंकन करण्यात आले होते पण उपकरणात बिघाड झाल्यामुळे त्या कासवांचा मागोवा घेणे शक्य झाले नाही. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, खंड ३ अंक २, खंड ३ अंक ३, खंड ४ अंक २*)

**स्रोत** – 'ऑलिव्ह रिडले कासवाचा १२०० किलोमीटरचा प्रवास,' *www.loksatta.com*, १९.०६.२०२३.
'गुहागरचे ऑलिव्ह रिडले कासव पोहोचले थेट श्रीलंकेत; उपग्रह टॅग केलेल्या 'बागेश्री'चा अवघ्या चार महिन्यातला थक्क करणारा प्रवास,' *www.loksatta.com*, ०६.०७.२०२३.



**पाण्याशिवाय टिकून राहणाऱ्या ६२ वनस्पतींची नोंद; बहुतांशी वनस्पती सह्याद्रीच्या रांगेत**

पाण्याशिवाय टिकून राहणाऱ्या (डेसिकेशन टॉलरंट) ६२ वनस्पतींची नोंद संशोधकांनी केली आहे. यातील बहुसंख्य वनस्पती सह्याद्रीच्या रांगेत आढळल्या. या विषयाचा शोधनिबंध 'नॉर्डिक जर्नल ऑफ बॉटनी' या संशोधनपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

पुण्यातील आघारकर संशोधन संस्थेतील वनस्पती वैज्ञानिक डॉ. मंदार दातार; तसेच स्मृती विजयन, अबोली कुलकर्णी आणि भूषण शिगवण यांच्या चमूने जर्मनीतील रॉस्टॉक विद्यापीठातील डॉ. स्टेफान पोरेंबस्की यांच्या सहभागाने हे संशोधन केले आहे.

डेसिकेशन टॉलरंट वनस्पती बिया रुजवून नवीन झाडे तयार करण्याऐवजी पाण्याशिवाय जगण्याचा प्रयत्न करून पावसाळ्यात नव्याने फुलतात. ऑस्ट्रेलियातील ज्येष्ठ वनस्पतितज्ञ डॉ. डोनाल्ड गाफ आणि मुंबईतील पी. व्ही. बोले यांनी १९८६ मध्ये भारतातील अशा नऊ वनस्पतींचा शोध लावला होता.

हवामान बदलांमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना समोरे जाताना पाण्याशिवाय टिकाव धरणाऱ्या या वनस्पतींचा माणूस उपयोग करून घेऊ शकतो, असे दक्षिण आफ्रिकेतील अभ्यासक डॉ. जील फेटेन्ट सांगतात. या वनस्पतींमधील जनुकांचा पिकांसाठी वापर केल्यास भविष्यात कमी पाण्यातही त्यांची चांगली वाढ होऊ शकते. तसेच, दुष्काळी प्रदेशातील हरीत आच्छादन वाढवण्यासाठी त्यांचा उपयोग करता येईल, यावर डॉ. फेटेन्ट यांचे संशोधन सुरू आहे. भारतातही अशा प्रकारच्या संशोधनासाठी खूप संधी आहेत, याकडे डॉ. दातार यांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत** - 'पुणे: आठ महिने पाण्याविना जगू शकणाऱ्या वनस्पतींचा शोध,' *www.loksatta.com*, १५.०६.२०२३.
चैत्राली चांदोरकर. 'काय सांगता! पश्चिम घाटात ६२ चमत्कारी वनस्पतींचा शोध, जगण्यासाठी पाण्याची गरज नाही?' *maharashtratimes.com*, ०४.०६.२०२३.

## विदर्भ

**पवनी तालुक्यात एका आठवड्यात वाघाच्या हल्ल्यांत दोन मृत्यू; वनाधिकाऱ्यांना मारहाण**




भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात खातखेडा इथे शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या वृद्धाचा २८ जून रोजी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. घटनेविषयी कळताच घटनास्थळी

गेलेल्या वनाधिकाऱ्यांवर संतप्त जमावाने हल्ला चढवला. यात एक सहाय्यक वनरक्षक व इतर दोन वनकर्मचारी गंभीर जखमी झाले. वनाधिकाऱ्यांवर हल्ला करण्यासाठी जमावाला चिथावणाऱ्या आणि शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या पाच जणांवर पवनी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, या वाघाला वन विभागाने जेरबंद केले आहे. भंडारा आणि गोंदिया इथल्या शीघ्र प्रतिसाद दलांसह नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. ड्रोनच्या सहाय्याने वाघाचा शोध घेऊन त्याला जेरबंद केले.

खातखेड्यातील वाघाच्या हल्ल्यात झालेला ईश्वर सोमा मोटघरे यांचा मृत्यू एकाच आठवड्यात तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात झालेला दुसरा मृत्यू आहे. २३ जून रोजी गुडेगाव इथे वाघाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला होता. त्यामुळे वाघाला जेरबंद केल्याशिवाय मृतदेहाला हात लावू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला. घटनास्थळी आलेल्या वन कर्मचाऱ्यांना सुमारे १००-१५० ग्रामस्थांनी अडवून शिवीगाळ केली. जमावातील काहींनी लोकांना भडकावून “फॉरेस्टवाल्यांना मारा,” असे म्हणत तेव्हा जमावाची समजूत घालण्याच्या प्रयत्नात असलेल्या साहाय्यक वनसंरक्षकासह आलेल्या वनकर्मचाऱ्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

गंभीर जखमी झालेल्या वनकर्मचाऱ्यांवर स्थानिक रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना नागपुरातील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले.

**स्रोत** – ‘भंडारा : कर्तव्यावर असलेल्या वनाधिकाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या पाचजणांवर गुन्हे दाखल,’ *www.loksatta.com*, २९.०६.२०२३.
‘“दोघांचे बळी घेणाऱ्या वाघाला जेरबंद करा, अन्यथा...” संतप्त ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा,’ *www.loksatta.com*, २८.०६.२०२३.
‘भंडारा: दोन बळी घेणारा वाघ जेरबंद,’ *www.loksatta.com*, २८.०६.२०२३.
‘पवनी तालुक्यात वाघाने घेतला आणखी एक बळी; संतप्त जमावाचा वनरक्षकावर हल्ला,’ *www.loksatta.com*, २८.०६.२०२३.

## सारस पक्ष्यांची गणना; गेल्या वर्षीच्या तुलनेत पक्ष्यांची संख्या दोनाने कमी

भंडारा, गोंदिया आणि मध्य प्रदेशातील बालाघाट या जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात ‘सेवा संस्था’ आणि वन विभागाने १८ जून रोजी सारस क्रौंच (क्रेन) पक्ष्यांची गणना केली. त्यामध्ये भंडारा व गोंदिया जिल्ह्यांमध्ये मिळून ३५ आणि बालाघाट जिल्ह्यात ४९ पक्ष्यांची नोंद झाली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत एकूण संख्येत यंदा दोन पक्षी कमी झाले आहेत. गोंदिया जिल्ह्यात यंदा तीन सारस कमी झाले. मात्र, भंडारा जिल्ह्यात एक व बालाघाट जिल्ह्यात चार पक्षी वाढले. बाघ व वैनगंगा नदी गोंदिया आणि बालाघाट जिल्ह्याला वेगळे करते. नदीच्या दोन्ही बाजूला सारस पक्ष्यांना योग्य अधिवास अद्याप टिकून आहे. पण या अधिवासातही घरटी कमी होऊ लागल्याचे यावेळी दिसून आले आहे.

२०१७ पासून भंडारा जिल्ह्यात नियमित सारस गणना सेवा संस्था, गोंदिया व सेव्ह इकोसिस्टेम अँड टायगर, भंडारा तसेच भंडारा वन विभाग संयुक्तपणे गणना करत आहे. २०१७ ला तीन, २०१८ ला दोन, २०१९ ला तीन, २०२० ला दोन, २०२१ ला दोन, २०२२ ला तीन सारस पक्ष्यांची नोंद झाली होती. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३*)

**स्रोत** – ‘गेल्या तीन वर्षांपासून सात्यत्याने सारस पक्ष्यांच्या संख्येत घट; महाराष्ट्रात ३५ व मध्य प्रदेशात ४९ सारस पक्ष्यांची नोंद,’ *www.loksatta.com*, २६.०६.२०२३.
‘नागपूर: सारस पक्ष्याचे अस्तित्व धोक्यात! भंडारा जिल्ह्यात केवळ चार पक्षी आढळले,’ *www.loksatta.com*, १८.०६.२०२३.

## गडचिरोलीतील वन हक्कधारकांना दिलेल्या वन जमिनीची बेकायदा विक्री

गडचिरोली शहरालगत असलेल्या मुरखळा ग्रामपंचायतीतील वर्ष २००५ पूर्वीचे अतिक्रमण असलेली सर्व्हे क्रमांक १०८ व १८९/२ मधील आठ हेक्टर वन जमीन १२ लोकांना वन विभागाने वनहक्क कायद्यांतर्गत हक्कधारकांना दिली होती. मात्र, ही जमीन सपाट करून त्याचे खंड करून शहरातील शेकडो नागरिकांना बनावट कागपत्रांद्वारे भूखंड विक्री केल्याचे उघड झाले आहे.


कायद्यानुसार या जमिनीची विक्री किंवा हस्तांतरण करता येत नाही किंवा या जमिनीला अकृषकचा दर्जाही देता येत नाही. परंतु भूमाफियांनी महसूल विभागातील एका अधिकाऱ्याच्या मदतीने या जमिनीचे तुकडे पाडले. चंद्रपूर मार्गावरील एका भूविकासक कंपनीने एका तुकड्याला अकृषक करून त्यातील भूखंड अनेकांना विकले. काही भूमाफियांनी उर्वरित जमिनीवर प्लॉटची विक्री सुरू केली.

हा गैरप्रकार वन विभागाच्या लक्षात येताच विभागाने पूर्ण जागेचा पंचनामा करून अहवाल तयार केला व जुलै २०२२ मध्ये महसूल विभागाला कळवले. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त या सर्वांसोबत वन विभागाने पत्रव्यवहार केला. यापैकी एकाही अधिकाऱ्याने कारवाई केली नाही.

दरम्यान, या जागेवर काहीजणांनी पक्की घरे बांधली आहेत. भूमाफियांनी सर्व्हे क्रमांक १०८ ला लागून असलेली जागाही अवैधपणे ताब्यात घेतली आहे. ही जागा २५ ते ३० हेक्टरच्या जवळपास असून बाजारभावानुसार या जागेची किंमत शभर कोटी रुपयांच्या आसपास आहे.


उपविभागीय अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी २० जून रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. वनपट्टेधारकांना नोटीस बजावून त्यांचा जबाब घेतला आणि वनपट्टा अकृषक कसा केला या संदर्भात तपास सुरू केल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – 'गडचिरोली : वनहक्क जमीन घोटाळ्यात शेकडो नागरिकांची फसवणूक? बनावट कागपत्रांद्वारे भूखंडाची विक्री,' *www.loksatta.com*, २४.०६.२०२३
'गडचिरोली: वनपट्ट्यावर भूमाफियांचा ताबाप्रकरणी प्रशासन कारवाईच्या तयारीत, 'लोकसत्ता'च्या वृत्ताची महसूल विभागाकडून दखल,' *www.loksatta.com*, २१.०६.२०२३.
सुमित पाकलवार. 'गडचिरोली: वनहक्काने देण्यात आलेल्या कोट्यवधींच्या जमिनीवर भूमाफियांचा ताबा!' *www.loksatta.com*, २०.०६.२०२३.



<u>माणूस बिबट्या संक्षिप्त वृत्त</u>

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| जळगाव | जळगाव | धोबीवराड गावात बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार व शेतकरी गंभीर जखमी | लोकसत्ता, १८.०५.२०२३ |
| | पाचोरा | कुरंगी इथे दिवसाउजेडी बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | ईसकाळ, २७.०५.२०२३ |
| नाशिक | चांदवड | मेसनखेडे खुर्द शिवारात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | लोकसत्ता, ०२.०७.२०२३ |
| | त्र्यंबकेश्वर | पिंपळद इथे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी १६ पिंजऱ्यांसह २५ ट्रॅप कॅमेरे व पाच पथके तैनात | महाराष्ट्र टाइम्स, १३.०४.२०२३ |
| पुणे | आंबेगाव | मंचरमध्ये अवसरी खुर्द परिसरात बिबट्याने घोडीची शिकार | लोकसत्ता, ०४.०६.२०२३ |
| | | पारगाव शिंगवे इथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | महाराष्ट्र टाइम्स, ०१.०५.२०२३ |
| | इंदापूर | पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पळसदेव गावाजवळ काळेवाडी इथे वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू | लोकसत्ता, ०३.०५.२०२३ |
| पालघर | डहाणू | कोसबाड इथे लिलकपाड्यावर बिबट्याच्या हल्ल्यात शेतमजूर जखमी | महाराष्ट्र टाइम्स, २२.०५.२०२३ |
| बुलढाणा | - | ज्ञानगंगा अभयारण्यात दुचाकीच्या धडकेत बिबट्या जखमी | लोकसत्ता, १९.०६.२०२३ |



**वन विभागाने जेरबंद केलेल्या बिबट्याची उपासमार**

अहमदनगर जिल्ह्यातील लोणी गावात वन विभागाच्या कार्यालयात कोपरगाव इथे पकडलेला बिबट्या ठेवला आहे. या बिबट्याला वन विभागाने चपात्या खायला दिल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे या बिबट्याची उपासमार झाल्याचे वृत्त आहे.वन विभागाने जेरबंद केलेल्या वन्य प्राण्यांची प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत काळजी घेणे ही विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी आणि संबंधितांवर योग्य कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांने केली आहे.

**स्रोत** – मोबिन खान. 'वनविभागाचा प्रताप, बिबट्याला खाऊ घातल्या चपात्या; बिबट्याची तब्बल तीन दिवस उपासमार,' *maharashtratimes.com*, २५.०६.२०२३.

## वन्यजीव शिकार व तस्करी वृत्त

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ ने वन्यजीवांची शिकार, त्यांची व त्यांच्या अवयवांचा व्यापार करण्यावर बंदी आहे. ही बंदी संरक्षित क्षेत्रासह इतरत्रही लागू आहे. तरीदेखील, देशातील ठिकठिकाणी वन्यजीवांची बेकायदा शिकार आणि तस्करी होत असते. या घटना मोठ्या संख्येने उघडकीस येतात. पँगोलीनच्या शिकारीविषयी वृत्तांकन यापूर्वी आणि प्रस्तुत अंकातही आले आहे. मात्र, सगळ्याच बातम्यांचा समावेश या वार्तापत्रात करणे विविध मर्यादांमुळे शक्य होत नाही. वन्यजीवांची शिकार व तस्करीच्या समस्येची व्याप्ती बरीच मोठी आहे. सर्वसामान्यांना कल्पनाही करता येणार नाही अशा कारणांसाठी नानाविध वन्यजीवांची शिकार, त्यांच्या अवयवयांची तस्करी होत असते. याविषयीच्या वृत्तांकनाची ही झलक.

---

### अंबरग्रीसची तस्करी करणाऱ्यांना कोल्हापूर जिल्ह्यात अटक; सुमारे ११ कोटींचे अंबरग्रीस जप्त

कोल्हापूर पोलिसांनी मे महिन्याच्या अखेरीस आंबोली आजरा मार्गावर व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून १० कोटी ७४ लाख रुपये किमतीचे १० किलो ६८८ ग्रॅम वजनाचे अंबरग्रीस जप्त केले.

**स्रोत** – 'व्हेल माशाची उलटी विक्री करणारी टोळी पकडली; अकरा कोटीचा मुद्देमाल जप्त,' *www.loksatta.com*, २७.०५.२०२३.

### वाघाच्या कातडीची तस्करी करणाऱ्यांना भंडारा जिल्ह्यातील पवनी इथे अटक

वाघाच्या कातडीची तस्करी करणाऱ्या नागपूर व भंडारा वन विभागाच्या पथकाने अटक केली. ही कारवाई २२ जून रोजी पवनी इथे करण्यात आली. दोघे आरोपी चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांच्याकडून पोलिसांनी वाघाची कातडी व दुचाकी जप्त केली.

**स्रोत** – किशोरी तेलकर. 'वाघाच्या कातडीची तस्करी करणारे दोघे ताब्यात; वन विभागाची कारवाई,' *maharashtratimes.com*, २२.०६.२०२३.

### चंद्रपूर जिल्ह्यात कासवाच्या दुर्मीळ प्रजातीची खरेदीविक्री उघडकीस

कासवाच्या 'एशिआटिक सॉफ्ट शेल टर्टल' प्रजातीची २५ हजार रूपये किमतीला विक्री करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील दोघांना अटक केली आणि कासव जप्त केले. गुप्तधन शोधण्यासाठी या कासवाचा उपयोग होतो या अंधश्रद्धेपोटी आरोपींनी कासवाच्या खरेदीविक्रीचा व्यवहार केला.

**स्रोत** – 'विक्रीसाठी आणलेल्या दुर्मिळ प्रजातीच्या कासवाची सुटका, दोन आरोपींना अटक,' *www.loksatta.com*, ११.०७.२०२३.

### अकोला शहरातील आयुर्वेदिक दुकानाच्या माध्यमातून वन्यजीवांची तस्करी

वनाधिकाऱ्यांनी अकोला शहरातील आयुर्वेदिक औषधी दुकान व गोदामावर छापा घालून वन्य प्राण्यांचे अवशेष, नखे, शिंगे जप्त केली आणि चौघांना अटक केली.

अकोल्यातील मोहम्मद अली मार्गावर अमरसिंह हे आयुर्वेदिक औषधांचे दुकान आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे अकोला वन वन विभागाने दुकानावर आणि संबंधित तीनचार गोदामांवर छापे घातले. तेव्हा, तिथे सांबराची व काळविटांची शिंगे, घोरपडीचे अवशेष, वन्य प्राण्यांची नखे, सायाळा-(पॉर्क्युपाईन)-चे काटे, कासवाच्या पाठीवरील कवच, शंख, चंदनाची लाकडे, खैराचे तुकडे व अन्य दुर्मीळ वनस्पती आढळल्या.

**स्रोत** – 'धक्कादायक! आयुर्वेदिक औषधांच्या दुकानात वन्यप्राण्यांचे अवशेष; वनविभागाकडून चार आरोपींना अटक,' *www.loksatta.com*, २७.०४.२०२३.

## राष्ट्रीय बातम्या

### यंदा सहा महिन्यांत देशात सुमारे ९५ वाघांचा मृत्यू; पैकी महाराष्ट्रात १९ मृत्यू

एप्रिलमध्ये जाहीर झालेल्या व्याघ्रगणनेच्या आकडेवारीनुसार वर्ष २०१८ पासून देशात सुमारे २०० वाघ वाढले; तर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा– नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन (NTCA) -च्या आकडेवारीनुसार, या वर्षी २५ जूनपर्यंत, सहा महिन्यांत देशभरात ९५ पेक्षा अधिक वाघ मृत्युमुखी पडले. यातील सर्वाधिक २४ वाघांचा मध्य प्रदेशात, १९ वाघांचा महाराष्ट्रात व उत्तराखंडमध्ये १४ वाघांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने चौकशीचे आदेश दिले आहेत. मध्य प्रदेशात झालेल्या वाघाच्या शिकारीनंतर केंद्रीय वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा – सेंट्रल वाइल्डलाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो (WCCB) ने अनेक राज्यांना सावधानतेचा इशारा दिला आहे (संबंधित वृत्त पाहा पान क्र. ९).

हे व्याघ्र मृत्यू प्रकल्पाच्या आत जितके आहेत, तितकेच ते व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेरदेखील झाले आहेत. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पांसह सर्वच व्याघ्र क्षेत्रांवर लक्ष ठेवण्याची गरज वृत्तात व्यक्त केली आहे.

**स्रोत** – 'अवघ्या सहा महिन्यांत ९५ हून अधिक वाघांचा मृत्यू; २०१८ पासून संख्येत दोनशेने वाढ,' *www.loksatta.com*, ०९.०७.२०२३.

### ताडोबा, पेंचसह देशातील १३ व्याघ्र प्रकल्प शिकाऱ्यांचे लक्ष्य; WCCB चा सावधानतेचा इशारा

ताडोबा अंधारी आणि पेंच व्याघ्र प्रकल्पांसह भारतातील १३ व्याघ्र प्रकल्पांना केंद्रीय वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा – सेंट्रल वाइल्डलाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो (WCCB) ने सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला आहे.

साताठ वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील शिकारी टोळ्यांनी मेळघाट, ताडोबा, पेंच या व्याघ्र प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाघांची शिकार केली. त्यात २० ते २५ वाघ ठार झाले आणि शंभराहून अधिक शिकाऱ्यांना अटक झाली. कटनी इथल्या बहेलिया समुदायातील सदस्यांचा या शिकाऱ्यांमध्ये समावेश होता.

२०१६ नंतर शिकाऱ्यांचा उच्छाद सुरूच होता पण त्यावर बरेच नियंत्रण आले. आता, वन खाते निश्चिंत झाल्याचा फायदा घेत शिकाऱ्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे, असे WCCB चे मत आहे. अलीकडेच मध्य प्रदेशातील सातपुडा व्याघ्र प्रकल्पात चोरना गाभा क्षेत्रातील एका जलाशयात वाघाचा मृतदेह सापडला. शिकाऱ्यांनी वाघाची मान कापली होती. या घटनेनंतर WCCB ने सर्व व्याघ्र प्रकल्पांच्या क्षेत्र संचालकांना आणि अभयारण्यांसह लगतच्या क्षेत्राशी संबंधित अधिकाऱ्यांना सावधानता बाळगण्याच्या सूचना केल्या आहेत.


संघटित शिकारी टोळ्या व्याघ्र क्षेत्राभोवती सक्रिय आहेत. विशेषत: सातपुडा, ताडोबा, पेंच, कार्बेट, अमनगड, पिलीभीत, वाल्मिकी, राजाजी आणि बालाघाट, गडचिरोली, चंद्रपूर ही वाघांची क्षेत्रे शिकाऱ्यांच्या निशाण्यावर आहेत. त्यामुळे मंदिरे, रेल्वे स्थानके, बस स्थानके, पडक्या इमारती, सार्वजनिक निवारा स्थळे आदी ठिकाणी संशयास्पद वर्तन करणारे, भटके लोक आढळल्यास त्यांची चौकशी करावी. संवेदनशील भागांमध्ये गस्त वाढवावी. पोलिसांच्या संपर्कात राहून त्यांच्यासोबत माहितीची देवाणघेवाण करावी, असे निर्देश WCCB ने दिले आहेत.

वर्ष २०१३ ते २०१६ या कालावधीत वाघांच्या शिकारी झाल्या त्यात बहेलिया समुदायातील काही सदस्यांचा हात होता. शिकारीनंतर कातडी, अवयवांच्या तस्करीची कामे करणारे अनेक लोक 'बावरिया' समुदायातील सदस्य होते. आता पंजाब, हरियाणा, राजस्थान इथले 'बावरिया' समुदायातील काही सदस्य शिकारही करू लागल्याचे WCCB ने म्हटले आहे. चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांतील जंगलाबाहेरच्या मोठ्या गावांमध्ये

त्यांचे बस्तान असून ते स्थानिकांच्या संपर्कात असल्याची माहिती WCCB ने दिली आहे.

**स्रोत** – 'भारतातील व्याघ्र प्रकल्प शिकाऱ्यांच्या रडारवर; ताडोबा, पेंचला 'रेड अलर्ट',' *www.loksatta.com*, ०८.०७.२०२३.

**पँगोलीनची शिकार करणाऱ्या १५ दोषींना तुरुंगवास आणि दंड; १४ राज्यांमध्ये टोळीचे अस्तित्व**



पाच राज्यांमधील १५ आरोपींना पँगोलीन (खवलेमांजर) शिकार प्रकरणी मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील न्यायालयाने दोषी ठरवले आहे. न्यायालयाने दोषींना तीन वर्षे तुरुंगवास आणि १०,००० रु. दंडाची शिक्षा ठोठावली आहे. आणखी सात जणांना न्यायालयाने दोषी असल्याचा निकाल दिला आहे.

साहाय्यक वन संरक्षक रीतेश सिरोदिया यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथका– स्पेशल इन्वेस्टिगेशन टीम (SIT)-ने सुरुवातीला या टोळीतील शिकाऱ्यांना पकडले. वर्ष २०१५ मध्ये मध्य प्रदेशाचे तत्कालीन प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नरेंद्र कुमार यांनी तत्कालीन अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) सुहास कुमार यांच्याशी सल्लामसलत करून या SIT ची स्थापना केली. वनपाल शेखर शर्मा, वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन निगम आणि इंद्रसिंह बरे यांनी या शिकारी, तस्करांच्या टोळीला पकडण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. छिंदवाडाचे मुख्य वन संरक्षक चित्तरंजन त्यागी यांनी या SIT ला मार्गदर्शन केले.

SIT ने पकडलेली टोळी भारतातील १० राज्यांसह परदेशांत कार्यरत होती. सुरुवातीला या टोळीच्या सदस्यांविरोधात बालाघाट, सिवनी आणि छिंदवाडा या तीन ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यांच्या तपासाद्वारे ४२ आरोपींना विविध राज्यांमधून अटक करण्यात आली. त्यानंतर या टोळीच्या कारवायांची व्याप्ती लक्षात घेऊन SIT बरखास्त करून त्या ऐवजी पँगोलीनविषयक गुन्हयांच्या तपासासाठी विशेष कृती दला– स्पेशल टास्क फोर्स (STF) -ची स्थापना वन विभागाने केली. या STF ने १४ राज्यांमधून दोन परदेशी नागरिकांसह १७० व्यक्तींना पकडले.

ही टोळी पँगोलीनची शिकार करून त्यांच्या खवल्यांची चीन, व्हिएतनाम इथे विक्रीसाठी नेते. खवल्यांचा या देशांमधील वापर वनाधिकाऱ्यांना परिचयाचा आहे. मात्र, अलीकडे अंमली पदार्थात पँगोलीनचे खवले मिसळून क्रिस्टल मेथांफिटामाईन या अंमली पदार्थाचे उत्पादन करण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. त्यामुळे अमेरिकेतही पँगोलीनच्या खवल्यांची मागणी वाढली आहे. हे वनाधिकाऱ्यांसमोर नवे आव्हान आहे.

**स्रोत** – पी नवीन. 'Pangolin poaching: 15 from five states sentenced to 3-yr jail term,' *www.timesofindia.indiatimes.com*, १०.०६.२०२३.

**भारताच्या व्याघ्र प्रकल्पामुळे कार्बन उत्सर्जनात घट, एका अभ्यासाचा निष्कर्ष**

भारताच्या ५० वर्षांच्या व्याघ्र प्रकल्पामुळे देशातील वाघांच्या संख्येत वाढ झाली आणि त्याचबरोबर जंगलतोड कमी झाल्यामुळे कार्बन उत्सर्जनात घट झाली, असा निष्कर्ष एका अभ्यासात मांडला आहे.

नॅशनल युनिवर्सिटी ऑफ सिंगापूर आणि अमेरिकेतील प्रिन्स्टन युनिवर्सिटीतील सहा संशोधकांनी हा अभ्यास केला. त्यानुसार, वर्ष २००१ ते २०२० या कालावधीत व्याघ्र संवर्धनासाठी केलेल्या उपाययोजनांचा परिणाम म्हणून कार्बन उत्सर्जन टाळून ११०.२९ दशलक्ष अमेरिकी डॉलर रकमेची बचत भारताने केली आहे.

'नेचर इकॉलॉजी अँड इवोल्युशन जर्नल' या विज्ञानपत्रिकेने या अभ्यासावर आधारित शोधनिबंध प्रकाशित केला आहे.

संशोधकांनी भारताचे संवर्धनविषयक धोरण, व्याघ्र प्रकल्पांतर्गत उपाययोजनांचे मूल्यांकन केले. देशातील वाघाचे अस्तित्त्व असलेल्या १६२ संरक्षित क्षेत्रांमधील जैवविविधतेचा अभ्यास केला. या क्षेत्रामुळे दहा लाख मेट्रिक टन कार्बन उत्सर्जन टाळणे शक्य झाले, असे निरीक्षण अभ्यासात नोंदवले आहे.

वर्ष २००७ पासून ४५ व्याघ्र प्रकल्पांमध्ये धोरणात्मक उपाययोजना राबवण्यात आल्या. त्यातील १५ व्याघ्र प्रकल्पांमध्ये त्याचे महत्त्वपूर्ण व काहीसे सकारात्मक परिणाम दिसून आले तर, ११ व्याघ्र प्रकल्पांमध्ये जंगलतोड लक्षणीयरित्या घटली.

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सर्वात मौल्यवान ठरलेल्या तीन व्याघ्र प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातील नवेगाव नागझिरा, ओदिशातील सिमिलीपाल आणि छत्तीसगडमधील उदांती सीतानदी व्याघ्र प्रकल्पांचा समावेश आहे, असे अभ्यासांती दिसून आले आहे. या उलट, सर्वात निकृष्ट दर्जाची कामगिरी उत्तर प्रदेशातील पीलीभीत, तमिळ नाडूमधील आणिमलाई आणि मिझोरममधील डाम्पा व्याघ्र प्रकल्पांची असल्याचे अभ्यासात नोंदवले आहे.

नुकत्याच झालेल्या व्याघ्रगणनेच्या निकालानुसार, देशात ३,१६७ वाघ असून गेल्या १५ वर्षांत देशातील वाघांच्या संख्येत १,७५६ वाघांची वाढ झाली आहे. वर्ष २०१८ ते २०२२ या चार वर्षांत देशातील वाघांची संख्या ६.७ टक्क्यांनी वाढली आहे.

**स्रोत** – हेमंत कुमार रौत. 'Tiger reserves saved carbon emissions worth USD 110 million,' *www.newindianexpress.com*, २३.०६.२०२३.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या प्रजननावर दुष्परिणाम; साँगबर्ड्सची संख्या घटण्याची शक्यता

हवामान बदलाचा परिणाम पक्ष्यांच्या प्रजननावर होत असून वाढत्या उष्णतेमुळे त्यांचे पिल्लांना जन्म देण्याचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने 'साँगबर्ड' प्रकारातील पक्ष्यांची संख्या सुमारे १२ टक्क्यांनी कमी होऊ शकते, असा निष्कर्ष 'युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस' आणि 'मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटी' या अमेरिकी विद्यापीठांमधील शास्त्रज्ञांनी अभ्यासांती मांडला आहे. 'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस' या विज्ञानपत्रिकेत याबाबत शोधनिबंध प्रकाशित झाला आहे.

संशोधकांनी २००१ ते २०१८ या काळात उत्तर अमेरिकेतील वनक्षेत्राजवळील १७९ ठिकाणी ४१ स्थलांतरित आणि रहिवासी पक्ष्यांच्या प्रजातींच्या प्रजननाची वेळ नोंदवली. प्रजननक्षम पक्ष्यांची मोजणी केली. त्यानंतर उपग्रह प्रतिमेचा वापर करुन प्रत्येक अधिवासाभोवती वनस्पती कधी उगवतात हे तपासून वनस्पतींची उपलब्धता आणि पक्ष्यांचे प्रजनन यांतील परस्परसंबंध लक्षात घेतला. पिल्ले वाढताना अन्नाची उपलब्धता महत्त्वाची ठरते. योग्य हवामानाअभावी अन्न उपलब्ध झाले नाही तर पक्ष्यांकडे पिल्लांना जगवण्यासाठीइतर पर्याय नसतात. हे या अभ्यासांती दिसून आले आहे. हवामान बदलाचे आणखी वाईट परिणाम होण्याआधी पक्ष्यांची संख्या वाढवण्यासाठी ठोस धोरण निर्धारित करावे लागेल, याकडे या अभ्यासाच्या अखेरीस लक्ष वेधण्यात आले आहे.

**स्रोत** - 'उष्ण वातावरणामुळे पक्ष्यांच्या प्रजननावर परिणाम; पिल्लांना जन्म देण्याचे प्रमाणही कमी; 'साँगबर्ड' प्रजातीतील पक्ष्यांची संख्या कमी होण्याची शक्यता,' *www.loksatta.com*, ०७.०७.२०२३.

## वाचकपत्रे

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र’ या त्रैमासिकाची ऑक्टोबर २०२२ ची प्रत प्राप्त झाली. मी आपला आभारी आहे. या पत्रिकेत दिलेली माहिती महत्त्वपूर्ण असून त्यातून आजची वने, वन्य प्राणी, त्यांचे संवर्धन, संरक्षित क्षेत्रातील मानवाच्या हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे बिकट प्रसंग, संघर्ष, सामाजिक संस्थांद्वारे होणारे भरीव कार्य आणि त्यासोबत शासनाकडून वनांमध्ये राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची सद्यस्थिती, त्यातील अपेक्षित सुधारणा व यशस्विता या विषयांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

‘कल्पवृक्ष’ या संस्थेचे व आपल्या प्रकाशनासाठी कृतीशील असलेल्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनपासून अभिनंदन करतो आणि या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

आपला नम्र,

**गिरीश गांधी**

वनराई प्रतिष्ठान, नागपूर

संरक्षित क्षेत्रातील कर्मचारी वर्गासाठी

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

हे वार्तापत्र निर्माण करताना वाचकवर्गात महाराष्ट्रातील वन कर्मचारी आणि संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करणारे अधिकारी हा एक मोठा गट असेल, असे लक्षात घेतले आहे. आजही जिथे इंटरनेट पोहोचलेले नाही, अशा दुर्गम भागात पोहोचावे, हा एक हेतू या वार्तापत्राची छापील आवृत्ती काढण्यामागे आहे. आमच्या यादीत अशा काही व्यक्तींचा समावेश आहे. मात्र, ही यादी अद्याप परिपूर्ण नाही. तेव्हा, वाचक हो, तुम्हाला दरवर्षी रु. १५० भरून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रात व त्याच्या अवतीभवती काम करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र भेट देता येईल. संरक्षित क्षेत्र/कर्मचारी/अधिकारी किंवा मार्गदर्शक/ग्रामस्थाचे नाव, पत्ता ही माहिती आम्हाला पाठवा. प्रती पोहोचवण्याची जबाबदारी आमची!


संपर्क: संपादकीय पत्ता c/o कल्पवृक्ष किंवा marathipaupdate@gmail.com



## Books from the *PA Update* stable


The set of 3 available for a special 25% discounted price of Rs. 1000

1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: Rs. 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100-line drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, please write to** psekhsaria@gmail.com

# महाराष्ट्रातील वन्यजीव अभयारण्ये

| क्र. | अभयारण्याचे नाव | जिल्हा | क्षेत्र (चौरस किमी) |
|---|---|---|---|
| १ | अंबा बरवा वन्यजीव अभयारण्य | बुलढाणा | १०२.१० |
| २ | अंधारी वन्यजीव अभयारण्य | चंद्रपूर | ४६१.७५८ |
| ३ | अनेर डॅम वन्यजीव अभयारण्य | धुळे | ८२.९४ |
| ४ | भामरागड वन्यजीव अभयारण्य | गडचिरोली | ०.०००१०४३८ |
| ५ | भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य | पुणे, ठाणे, रायगड | १३०.७८ |
| ६ | बोर वन्यजीव अभयारण्य | वर्धा, नागपूर | ६१.१० |
| ७ | चपराळा वन्यजीव अभयारण्य | गडचिरोली | १३४.७८ |
| ८ | देऊळगाव रेहकुरी काळवीट अभयारण्य | अहमदनगर | २.१७ |
| ९ | ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य | बुलढाणा | २०३.५६ |
| १० | गौताळा औट्रमघाट वन्यजीव अभयारण्य | औरंगाबाद, जळगाव | २६०.६१ |
| ११ | ग्रेट इंडिअन बस्टर्ड अभयारण्य | सोलापूर | ६७७.९७ |
| १२ | जायकवाडी पक्षी अभयारण्य | औरंगाबाद | ३३९.७९ |
| १३ | कळसूबाई हरिश्चंद्र गड वन्यजीव अभयारण्य | अहमदनगर, नाशिक, पुणे,ठाणे | ३६१.७१ |
| १४ | करंजा सोहोळ काळवीट अभयारण्य | वाशिम | १७.७८४ |
| १५ | कर्नाळा पक्षी अभयारण्य | रायगड | १२.११ |
| १६ | काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य | अकोला, वाशिम | ७३.६९ |
| १७ | कोयना वन्यजीव अभयारण्य | सातारा | ४२३.५५ |
| १८ | लोणार वन्यजीव अभयारण्य | बुलढाणा | १.१७१४ |
| १९ | मालवण सागरी अभयारण्य | सिंधुदुर्ग | २९.१२२ |
| २० | मयुरेश्वर सुपे वन्यजीव अभयारण्य | पुणे | ५.१४५ |
| २१ | मेळघाट वन्यजीव अभयारण्य | अमरावती | ७६७.३४ |
| २२ | नागझिरा वन्यजीव अभयारण्य | भंडारा, गोंदिया | १५२.५८२ |
| २३ | नायगाव मयूर अभयारण्य | बीड | १९.९३ |
| २४ | नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्य | नाशिक | १००.१२ |
| २५ | नरनाळा वन्यजीव अभयारण्य | अकोला | १२.३५ |
| २६ | पैनगंगा वन्यजीव अभयारण्य | यवतमाळ, नांदेड | १००.२७ |
| २७ | फणसाड वन्यजीव अभयारण्य | रायगड | ६९.७९ |
| २८ | राधानगरी वन्यजीव अभयारण्य | कोल्हापूर | ३५१.१६ |
| २९ | सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य | सांगली | १०.८७ |
| ३० | तानसा वन्यजीव अभयारण्य | ठाणे, पालघर | ८८.०६ |
| ३१ | ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य | ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर | १६.९०५ |
| ३२ | टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य | यवतमाळ | १४०.२९ |
| ३३ | तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य | पालघर | ८५.७० |
| ३४ | वान वन्यजीव अभयारण्य | अमरावती | २०५.८६ |
| ३५ | यावल वन्यजीव अभयारण्य | जळगाव | १७७.५२ |
| ३६ | येडशी रामलिंगघाट वन्यजीव अभयारण्य | उस्मानाबाद | ८.५२ |

स्रोत - https://wiienvis.nic.in/Database/Maharashtra_7829.aspx (जुलै २०२३)

## महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने

| क्र. | राष्ट्रीय उद्यानाचे नाव | जिल्हा | क्षेत्र (चौरस किमी) |
|---|---|---|---|
| १ | चांदोली राष्ट्रीय उद्यान | कोल्हापूर, रत्नागिरी | ३१७.६७ |
| २ | गुगामाळ राष्ट्रीय उद्यान | अमरावती | ३६१.२८ |
| ३ | नवेगाव राष्ट्रीय उद्यान | गोंदिया | १३३.८८४ |
| ४ | पेंच राष्ट्रीय उद्यान | नागपूर | २५७.२६ |
| ५ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | मुंबई उपनगर | ८६.९६५ |
| ६ | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | चंद्रपूर | ११६.५४९ |

स्रोत - https://wiienvis.nic.in/Database/Maharashtra_7829.aspx (जुलै २०२३)



---


**AVAILABLE AT 25% DISCOUNT**

The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra
News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by

Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books

**<u>Contents:</u>**




**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (ShibaDesor); 4)Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

<u>ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line-drawings by Ashvini Menon</u>

**For copies at 25% discount write to** psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे...

## निसर्गचक्रात महत्त्वाची भूमिका बजावूनही उपेक्षित - वटवाघळे

निसर्गचक्रात अतिशय महत्वाची भूमिका बजावूनही वटवाघळे कायम दुर्लक्षितच राहिली आहेत. ही ना वाघासारखी दिमाखदार, ना पक्ष्यांसारखी सुंदर अन् सुरेल. विचित्र दिसण्यामुळे आणि रात्रीच्या वेळी कार्यरत असल्याने या सस्तन प्राण्यांबद्दल समाजामध्ये गैरसमजच जास्त पसरलेले आहेत.

वटवाघळे हा उष्ण रक्ताचा आणि उडू शकणारा एकमेव सस्तन प्राणी आहे. जगभरात त्यांच्या १४०० पेक्षा जास्त प्रजाती असून, भारतात १२९ प्रजातींची नोंद झाली आहे. जुन्या पडक्या इमारती, वापरात नसलेली घरे, देवळे, बोगदे, झाडांमधील ढोली, गुहांमधून वेगवेगळ्या जातींची वाघळे राहताना दिसतात. त्यांच्या आहारानुसार शाकाहारी (फळे, मध), मांसाहारी (कीटकभक्षी, बेडूक, उंदीर, मासे) असे मुख्य प्रकार आहेत.

फलाहारी वाघळांकडून केळी, आंबा, पेरू, फणस, काजू, कोको, मका, नीम, खजूर, कापूस अशा नगदी पिकांचे, खारफुटीच्या वनस्पतींचे परागीभवन, बीजप्रसारण केले जाते. त्याचबरोबर आपल्या जंगलातील २०० पेक्षा जास्त वृक्षांच्या बिया मैलोन्मैल पसरवून, त्यांच्या बीजरोपणात आणि नवीन जंगल रुजवण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. प्रत्येक कीटकभक्षी वाघळाकडून दररोज २००० ते ५००० कीटकांचा (मच्छर आणि इतर सदृश कीटक) फडशा पाडला जातो. आपल्या पिकांवरही आणि फळबागायतींमधील कीटकांना संपवून आपले उत्पन्न वाचवण्याचे, देशाची अन्न सुरक्षा आणि आरोग्य अबाधित राखण्याचे कामही याच वटवाघळांद्वारे केले जाते. वटवाघळांच्या या कामगिरीविषयी म्हणावी तितकी जाण समाजात नाही. वाघळांच्या बहुतेक प्रजातींना वन्यजीव कायद्यांतर्गत संरक्षणही मिळालेले नाही.

वटवाघळे ही २०० पेक्षा जास्त संसर्गजन्य रोगांच्या विषाणूंची वाहक असल्याकारणाने, त्यांच्यामुळेच रोगप्रसार होतो असा गैरसमज आहे. यामुळे सर्वसाधारणपणे सर्वच वटवाघळांबद्दल नकारात्मक वातावरण तयार होऊन त्यांच्या संवर्धन प्रक्रियेत बाधा येते. तीन वर्षांपूर्वी कोरोना संक्रमण जगभर सुरू झाल्यावर विषाणूच्या उत्पत्तीबाबत ठोस माहिती मिळवण्याआधीच प्रसारमाध्यमांमधील अनेकजण वटवाघळांना दोषी ठरवून मोकळे झाले.

'इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्च'ने प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट सांगितले आहे की भारतातील वटवाघळांच्या दोन प्रजातींमध्ये बॅट कोरोना विषाणू (BtCoV) आढळला आहे. परंतु, हा SARS-CoV-2 पेक्षा वेगळा असून त्यामुळे COVID-19 होऊ शकत नाही. COVID-19 ला कारणीभूत SARS-CoV-2 विषाणूचा नेमका उगम कोणता, हे कोडेच आहे. अलीकडच्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्यामागे मानव -वन्यजीव यांच्यातील संघर्ष, बदलणारे नाते, जागतिक वन्यजीव व्यापार आणि औद्योगिक पशुधन शेती या सर्वांकडे संभाव्य कारणे म्हणून पाहायला हवे. शिकार, रासायनिक कीटकनाशकांचा अनियंत्रित वापर, बेसुमार जंगलतोड, गुहांसारख्या नैसर्गिक अधिवासात माणसांचा हस्तक्षेप, वाघळांच्या वसतिस्थानांचा नाश इ. कारणांमुळे आपल्या भागातील वटवाघळांना मोठे धोके आहेत.

विविध परिसंस्थांमधील वटवाघळांची भूमिका आणि त्यांचे योगदान याबद्दल फारशी माहिती आणि अभ्यास नसल्यामुळे वाटवाघळांच्या संरक्षणासाठी सहसा प्रयत्न केले जात नाहीत. माणूस व वन्यजीव यांच्या निरोगी सहजीवनासाठी साथीच्या आजारांच्या विषयाबरोबरच आजूबाजूच्या वटवाघळांबद्दल अधिक जागरूकतेची समाजाला आवश्यकता आहे, जेणेकरून त्यांच्या संवर्धनासाठी वेळीच प्रयत्न केले जातील.

- **राहूल प्रभुखानोलकर**

pkrahul85@gmail.com

शिक्षक, पदव्युत्तर पर्यावरणशास्त्र, जी एस एस महाविद्यालय, बेळगाव आणि इंडिअन बॅट कॉन्झर्वेशन रीसर्च युनिट, बेळगाव.

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004